**Maratha Vidya Prasarak Samaj Nashik.**

**G.M.D. Arts, B.W. Commerce and Science College, Sinnar.**

# Programme Report 2019-20

| | | |
|---|---|---|
| **Name of Department / Committee** | : | **Defence & Strategic Studies** |
| **Name of the Event** | : | **Army Pre-Recruitment Training** |
| **Occasion** | : | **Indian Border Security** |
| **Coordinator of the Event** | : | **Prof.Pawar.R.V, Prof.Khurche D.K** |
| **Date(s)** | : | **13 January 2020** |
| **Level** | : | **College Level** |
| **Chief Guest** | : | **CHM. Balasaheb More** |
| **Beneficiary Group** (Students, Faculty, Staff, Society, Parents, Alumni, Other) | : | **Students** |
| **Total Beneficiary** | : | **Total: 104**<br>**M: 32**<br>**F: 72** |

**Please attach detail report of event organized**

**HEAD**
Department of Defence & Strategic Studies
G.M.D.Arts, B.W.Commerce and Science College, Sinnar, Dist. Nashik

G.M.D.ARTS, B.W.COMMERCE AND SCIENCE COLLEGE SINNAR
SINNAR 422 103

**Dr. Dilip B. Shinde**
**Principal**
PRINCIPAL
G.M.D.Arts, B.W.Commerce and Science College, Sinnar,Dist.Nashik

G.M.D ARTS, B.W.COM. & SCIENCE COLLEGE, Sinnar 422103

# मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक

## गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सिन्नर

## संरक्षण आणि सामरिक शास्त्र

## सैन्यभरती पूर्व प्रशिक्षण अहवाल

दि १३/०१/२०२०

गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील संरक्षण आणि सामरिक शास्त्र विभगाद्वारे सैन्यभरती पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला या निमित्ताने व्यासपीठावर प्रमुख मार्गदर्शक सी.एच.एम बाळासाहेब मोरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिलीप बी. शिंदे, उपप्राचार्य आर.व्ही.पवार, एन.सी.सी ऑफिसर डॉ.यु.ए.पठाडे, प्रा. दीपक खुर्चे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रा.आर.व्ही.पवार यांनी पाहुण्याची ओळख व प्रास्ताविक केले. भारताची राष्ट्राची सुरक्षितता अबाधित राहण्यासाठी शारीरिक मानसिक, बोद्धीक दृष्ट्या सक्षम विद्यार्थ्यांना योग्य दिशा देण्याचे कार्य संरक्षण व सामरिक शास्त्र विभाग करत आहेत करत आहेत. विविध उपक्रमातून देशहित, कायदा व सुव्यवस्था सुरळीत राहावा म्हणून असे कार्यक्रम महाविद्यालयात प्रा डॉ दिलीप बी. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करत आहोत.

याप्रसंगी सी.एच.एम बाळासाहेब मोरे यांनी आपल्या मनोगतात म्हटले कि, देशातील नागरिकांमध्ये देशाविषयी राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती निर्माण होणे गरजेचे आहे. त्याचबरोबर देशाच्या सुरक्षेसाठी सर्व स्तरावर सुरक्षाव्यवस्था निर्माण केल्यामुळेच देश सुरक्षित राहू शकेल. सिन्नर तालुक्यातील विद्यार्थ्यांची भारतीय सेनेत जाण्याची इच्छाशक्ती अधिक दिसते. बहुसंख्येने युवक भरती झालेले दिसतात भारतीय सेनेत भरती होण्यासाठी विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम भरतीसाठी लागणारी पात्रता आपल्यामध्ये आहे का ? त्यासाठी कोणत्या परीक्षा घेतल्या जातात. याचा विचार करावा. त्यानंतर नियोजन करून भरतीची तयारी करावी. भारतीय सेनेमध्ये भरती होण्यासाठी लेखी परीक्षा, शारीरिक परीक्षा, वैदयकीय तपासणी या पात्रता परीक्षा घेतल्या जातात. त्यानंतर त्या युवकाला सैन्यात भरती केले जाते. आज विद्यार्थ्यांनी सेनेत अधिकारी होण्याचे स्वप्न बघावे. त्यामुळे देशसेवेसाठी तुम्हाला अधिक अधिकार मिळतात. भारतातील विविध सैन्य प्रशिक्षण केंद्राबद्दल माहिती दिली.

G.M.D.ARTS, B.W.COM. & SCIENCE COLLEGE * Sinnar 422103

याप्रसंगी अध्यक्षीय भाषणामध्ये प्राचार्य डॉ दिलीप बी. शिंदे यांनी म्हटले, आपल्या महाविद्यालयात सैन्यभरती पूर्व मार्गदर्शन हा कार्यक्रम प्रत्येक वर्षी घेतला जातो. या कार्यक्रमाचा हाच उद्देश आहेत कि, विद्यार्थी देशसेवेसाठी सदैव तत्पर रहावे. देशाविषयी आदर, देशप्रेम, देशभक्ती निर्माण व्हावी. विद्यार्थ्यांनी भारतीय सेनेत उच्च पदावर जाऊन देशसेवेत योगदान द्यावे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी सी.डी.एस, एन.डी.ए, या सारख्या परीक्षाचा अभ्यास करावा. एन.सी.सी च्या विद्यार्थ्यांना या सारख्या परीक्षा न देता भारतीय सेनेत अधिकारी होता येते. याची एन.सी.सी च्या विद्यार्थ्यांनी संधी घ्यावी. देश सेवा करणे हे आपले कर्तव्य आहे असे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमाच्याप्रसंगी प्रा.सी.इ.गुरुळे, प्रा.एन.के.जाधव, प्रा.आर.डी.आगवणे व एन एन सी विद्यार्थी व विद्यार्थिनी, महाविद्यालायचे विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संखेने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्र संचालन प्रा. दीपक खुर्चे यांनी केले व डॉ.यु.ए.पठाडे यांनी आभार मानले.

HEAD
Department of Defence &
Strategic Studies
G.M.D.Arts, B.W.Commerce and
Science College, Sinnar, Dist. Nashik